



# नाटक पहावे करून...

■ मुकुंद मराठे

शनिवारची दुपार. अलका आणि रवी कुलकर्णीच्या घरातली फॅमिली रूम. नंदू जावडेकर आणि सुधीर आळेकर यांचा 'काकाजी, आत्मा अमर आहे'चा सीन रंगात आलेला. अरुण लोंढे त्यांना प्रसंग आणखी खुलवण्यासाठी नेमक्या सूचना करतोय. किचनमध्ये खमंग कांदे-पोहे करता करता अतिविशाल महिला मंडळात काम करणाऱ्या बायकांची खमंग चर्चा चालली आहे. चहाचं आधण उकळतंय. फ्रीजमध्ये बीअर थंड करत ठेवली आहे. बे एरियातल्या नाटकवेड्या मंडळींची आणि माझी ओळख अशी एकदम मस्त, मनमोकळ्या वातावरणात झाली.

मग 'घेतलं शिंगावर'च्या निमित्ताने मी हळूच या सगळ्या मंडळींत शिरकाव करून घेतला. दरवर्षी नाटकात कमीत कमी ५० टक्के नवीन कलाकार असावेत असा अरुणचा आग्रह असायचा. त्यामुळे विठ्ठल आणि चारू भावे, गौरी पेंढारकर आणि माझा नंबर लागला. या नाटकात उदबत्ती विकायला येणाऱ्या लहान मुलाचं काम होतं. आता शुद्ध मराठी बोलणारा मुलगा इथं मिळणं म्हणजे एक आव्हानच होतं. पण अरुणने खूप कष्ट घेऊन वैभव मेढेकरकडून हे काम करून घेतलं. मला वाटतं, या नाटकाचा लॉस एंजिलिसमधल्या प्रयोगात भाव्यांच्या मुलानं ते काम केलं होतं. या नाटकात सुधीर आळेकरने उभा केलेला इन्स्पेक्टर वाकणकर लोकांची भरपूर करमणूक करून गेला.

या नाटकाच्या वेळेलाच विठ्ठल आणि चारू भावे यांच्या घरात दुसरा मजला बांधायचं काम चाललं होतं. त्यावेळी जी लाकडं फेकून देण्यात आली होती त्यातून आम्ही सगळ्यांनी सेट उभे करण्यासाठी लागणारे आधाराचे खांब तयार केले होते. त्यासाठी अरुणने केलेल्या इंजिनिअरिंगची आम्ही कितीही चेष्टा केली असली तरी हे खांब आम्हाला पुढची अनेक वर्षे उपयोगी पडले. अरुण आणि नूतन भिवंडकरांनी लाकडी चौकटी आणि कार्डबोर्ड वापरून तयार केलेले हे सेट दरवर्षीच्या नाटकाला अनुरूप अशा पद्धतीने रंगवणं हा फार आवडीचा कार्यक्रम असायचा. सगळे कलाकार आपली रंगकामाची हौस भागवून घ्यायचे आणि दरवाजाच्या खालच्या पट्टीपासून सगळा सेट रंगवून काढायचे. लॉस एंजिलिसमधल्या प्रयोगासाठी दीपा भिवंडकरच्या पिकअप ट्रकच्या मागे बांधून, ताडपत्रीने झाकून भर पावसात आम्ही हे सेट नेले होते. पुढे मग उंदरांनी हे खरंच घर आहे असं समजून त्याच्या भिंती पोखरल्या आणि पोखरलेल्या भिंती हव्या असलेलं नाटक डोळ्यांसमोर नसल्यामुळे आम्ही त्या सेटना नाइलाजाने निवृत्त केलं.

पुढच्या वर्षी 'सूर्याची पिल्ले'च्यावेळी विजय रोडे हा गुणी कलाकार मिळाला. स्वातंत्र्यसूर्याचा तापट आणि ध्येयवादी बजरंग विजयने मस्त उभा केला. त्यात अनाथ महिलाश्रम चालवणाऱ्या बनूताई (वीणा लोंढे) आणि त्यांच्यावर प्रेम करणारा स्वातंत्र्यसूर्याचा पुत्र पांडूअण्णा (अरुण लोंढे) यांचं सूत जमतं तो प्रसंग आणि "आपण हे जे लग्न करतोय ते राष्ट्रासाठी बरं का" हे अरुणचं वाक्य अजून माझ्या डोळ्यासमोर आले. या नाटकाच्या शेवटी कलाकारांची ओळख करून देताना अरुणने स्टेजवरूनच जाहीर करून टाकलं की, पुढच्या वर्षीच्या नाटकाचं दिग्दर्शन मुकुंद मराठे करील. अरुणचं याबाबतीत खरंच कौतुक करायला हवं. नाटकात ५० टक्के नवे कलाकार घ्यायचे याचबरोबर जर कुणी नवीन माणूस नाटक बसवण्याची तयारी दाखवत असेल तर त्याला उत्तेजन आणि संधी द्यायची आणि

सर्वांनी गोडीगुलाबीनं एकत्र काम करायचं यासाठी अरुण धडपडत असतो.

'झोपी गेलेला जागा झाला' हा बबन प्रभूंचा धमाल फार्स करायचं मी ठरवलं. सुधीर आळेकरचा भोळाभाबडा दिनू आणि माझा इरसाल विनू ही जोडी मस्त जमली. फार्स म्हणजे जमेल तेवढा आचरटपणा न लाजता करायचा. त्यासाठी रेखा नायक, शेफाली मुंगळे, सुनील केळकर आणि प्रकाश देशपांडे यांची साथ मिळाली. पण सगळ्यात लाजवाब म्हणजे प्रभाकर साठे यांनी केलेला डॉक्टर आठवले. गळ्यातच असलेला स्टेथोस्कोप गावभर शोधणारा, स्वत:चंच नाव विसरणारा, दिनूच्याऐवजी मीनालाच तपासणारा विसरभोळा आणि विक्षिप्त डॉक्टर आठवले हा प्रभाकर साठ्यांनी फारच सुंदर रंगवला.

त्याच्या पुढच्या वर्षी बृहन्महाराष्ट्र मंडळाचं अधिवेशन लॉस एंजिलिसला व्हायचं होतं. त्यानिमित्तानं एकांकिका स्पर्धा व्हायची होती. त्यासाठी सुधीर आळेकरनी 'दूर देशीचा वग – अर्थात यांकी देशात किसनदेव' हा फर्मास वग लिहिला. किसन कोनतरीकर हा तरुण इंजिनिअर व्हिसाच्या दिव्यामधून पास होऊन अमेरिकेला येतो, मग भारतात जाऊन लग्न करून बायकोला परत घेऊन येतो. त्याच्या नोकरीवरचं राजकारण,भानगडी, ले ऑफ, जपानी कंपनीने त्याची कंपनी विकत घेऊन टाकणं वगैरे धमाल कथानक आपल्या वगनाट्याच्या बांधणीमध्ये लिहायचं ही सुधीरची भन्नाट कल्पना. तसंच त्यातल्या पात्रांची नावं – गोरा प्रेसिडेंट : लखू राजे, काळा व्हाइस प्रेसिडेंट : सदा काळे, अमेरिकेन अनेक वर्षे राहिलेले किसनचे मित्र : आनंद आणि तृप्ती सेटलकर, व्हिसा अधिकारी : यांकी परवाना. यात अनुपमा दलालनं किसनच्या बायकोचं काम केलं होतं आणि एक सुंदर गवळण म्हटली होती. 'आला साजण, साजण माझा, आला सात समुद्रापलीकडूनी' ही गवळण सुधीरनी प्रख्यात संगीतकार आनंद मोडक यांना फॅक्स करून पाठवली होती आणि आनंद मोडकांनी त्याला पारंपरिक चाल लावून दिली. आजच्या काळात फॅक्स ही काही फारशी अपूर्वाइची गोष्ट नसली तरी तेव्हा ही घटना 'फॅक्सने गवळण पुण्यात' म्हणून वर्तमानपत्रात छापून आली होती. लॉस एंजिलिसच्या अधिवेशनात आमचा 'यांकी देशात किसनदेव' तुफान गाजला.

त्यानंतर मी 'अशी पाखरे येती' आणि 'अग्निपंख' ही दोन नाटकं बसवली. 'अशी पाखरे येती'साठी प्रथमच आम्ही आमचा सेट वर–खाली जाणारा केला. म्हणजे सेटची भिंत उचलून वर नेली की मागच्या खोलीतलं दृश्य दिसायचं. तो प्रसंग संपला की भिंती पुन्हा खाली आणून जागेवर ठेवायची. लॉस एंजिलिसमध्ये या नाटकाचा प्रयोग झाला तेव्हा तिथल्या थिएटर मॅनेजरने आमच्या सेटला कोपऱ्यात फळ्या मारून वर–खाली करण्यासाठी खुंट्या मारून दिल्या. त्याच मॅनेजरने हे सेटस फायर प्रूफ नाही आहेत, हे वापरता येणार नाहीत म्हणून आधी घाबरवलं होतं. 'अशी पाखरे येती'मधला मिलिंद गोळेचा बंडा फारच गाजला. याच मिलिंदनं एका प्रॅक्टिसला सुंदर साबुदाण्याची खिचडी आणि दाण्याचे लाडू आणून सगळ्यांना चकित करून सोडलं होतं. नाटकाच्या तालमीच्या वेळेला मिळणारं खाणं हा एका स्वतंत्र लेखाचा विषय आहे. अरुणच्या पात्रांच्या निवडीच्या निकषांमध्ये त्याला किंवा तिला काय चांगलं बनवता येतं हा महत्त्वाचा भाग असायचा. त्यातून तुम्हाला बदामाच्या वड्या किंवा पुरणपोळ्या वगैरे करता येत असेल तर तुमचा नंबर लागलाच.

**'घेतलं शिंगावर' च्या निमित्ताने मी हळूच या सगळ्या मंडळींत शिरकाव करून घेतला. दरवर्षी नाटकात कमीत कमी ५० टक्के नवीन कलाकार असावेत असा अरुणचा आग्रह असायचा. त्यामुळे विठ्ठल आणि चारू भावे, गौरी पेंढारकर आणि माझा नंबर लागला. या नाटकात उदबत्ती विकायला येणाऱ्या लहान मुलाचं काम होतं. आता शुद्ध मराठी बोलणारा मुलगा इथं मिळणं म्हणजे एक आव्हानच होतं.**

अग्निपंख नाटकासाठी मोठ्या वाड्याचा सेट उभा करायचा होता. आता आमच्या जुन्यापुराण्या कार्डबोर्डच्या सेटमध्ये चाळीतली खोली करणं सहज शक्य होतं. पण त्याच सेटमधून इनामदारांचा वाडा उभा करायची जबाबदारी शारदा गोडबोले आणि मीनाक्षी मराठे यांनी घेतली आणि अगदी थोड्या अवधीत देखणा सेट बनवून दिला. शिसवी लाकडाच्या कमानी, भिंतीवरचं नक्षीकाम, साजेसं फर्निचर या सगळ्यामुळे नाटकाचा पडदा उघडल्याबरोबर त्यांनी लोकांची वाहवा मिळवली. यात नूतन भिवंडकरांनी या वाड्यावर अनेक वर्षांपासून काम करणाऱ्या नोकराची भूमिका अप्रतिमपणे केली होती. यात हा नोकर एकदा फोन घेतो आणि पलीकडच्या माणसाच्या "रावसाहेब कुठे आहेत?" या प्रश्नाला "हायती आत" असं उत्तर देतो असा प्रसंग होता. नूतनची का कोण जाणे पण या "हायती आत" वाक्याला नेहमी गडबड उडायची. आयती हात, आत हायेत, हात आहेत काय वाट्टेल ते व्हायचं. एका प्रॅक्टिसला तर त्यानी फोन उचलून एकदम हाय एवढंच म्हटलं. अशिक्षित नोकर एकदम इकडच्या स्टाइलनी फोनवर हाय वगैरे म्हणायला लागलेला पाहून सगळेजण इतके हसत सुटले. हे प्रॅक्टिसला हसत राहणं हा एक संसर्गजन्य रोग आहे. एखाद्याला हसायला यायला लागलं की बाकीचेही हसायला लागतात आणि मग कितीही प्रयत्न केला तरी हसू थांबवताच येत नाही. मग

एखाद्या गंभीर प्रसंगाची साफ वाट.

त्यानंतर आलं सॅन होजेचं बृहन्महाराष्ट्र मंडळाचं अधिवेशन. अधिवेशनात नाटक करावं अशी आमची खूप इच्छा होती. पण बाहेर गावाहून अधिवेशनाला येणाऱ्या मंडळींना आकर्षित करण्यासाठी भारतातल्या नाम्यवर संस्थेचं नाटक आणणं जरुरीचं होतं. मग आम्ही मराठी गीत काव्याची वाटचाल या अरुण रानडे यांच्या कल्पनेवर 'खेळ मांडियेला' हा कार्यक्रम बसवला. यात १०० लहानमोठ्या कलाकारांनी भाग घेतला. इतक्या मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम सादर करायची आमची पहिलीच वेळ होती. पण अधिवेशनाच्या निमित्ताने जे एक प्रचंड उत्साहाचं वातावरण तयार झालं होतं, त्यामुळे अनेक गुणी कलाकार मिळाले आणि सर्वांच्या वर्षभराच्या अथक परिश्रमातून 'खेळ मांडियेला' रंगला. मनोज आणि हेमांगी वाडेकरचं ओघवतं निवेदन, अरुण रानडे, विवेक दातार आणि अभिनय पाध्ये यांचं संगीत संयोजन, निर्मल गोसावी, वृंदा भांडारकर आणि नंदिनी कान्हेरे यांचं नृत्यदिग्दर्शन, स्थानिक गायक-गायिकांनी म्हटलेली सुरेल गाणी, अतुल वैद्यचं ध्वनीचित्र संयोजन आणि सगळ्या कलाकारांचा अप्रतिम अभिनय यामुळे हा कार्यक्रम अविस्मरणीय झाला.

जून २००० ला पु.ल. गेले आणि आपल्या सगळ्यांच्याच आयुष्यात एक कधीही भरून न येणारी पोकळी निर्माण झाली. पुलंच्या स्मृतीला मानवंदना म्हणून काहीतरी भव्य करावं अशी माझ्या मनात कल्पना आली. पुलंचं व्यक्तिमत्त्व इतकं बहुरंगी-बहुअंगी होतं की त्यांचं एखादं नाटक, एखादा एकपात्री प्रयोग, एखादं कथाकथन, त्यांच्या संगीतावर आधारित एक कार्यक्रम यातून त्यांच्या अनेक पैलूंचं दर्शन होऊच शकणार नाही. मग हे सगळं एकाच कार्यक्रमात सादर करून एखाद्या संध्याकाळी सुरुवात करून दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत चालणारा कार्यक्रम करावा असं वाटलं. नाव ठरं 'नॉन स्टॉप पुलं'. मला वाटलं ही कल्पना ऐकल्यावर लोक मला वेड्यात काढतील. पण ज्याच्या ज्याच्या जवळ मी बोललो त्यानं ही कल्पना उचलून धरली. थिएटरच्या बंधनामुळे रात्रभर चालणारा कार्यक्रम करणं शक्य नव्हतं. म्हणून तीन भागात दिवसभर चालणारा कार्यक्रम करायचा असं ठरलं. पहिल्या मिटिंगसाठी पन्नासहून जास्त कलाकार आले. या कार्यक्रमात ५६ कलाकार होते. 'खेळ मांडियेला'च्या १०० कलाकारांपुढे हा ५६ कलाकारांचा कार्यक्रम किस झाडकी पत्ती वाटायला लागला. अभय पाटीलसारखा कष्टाळू कलाकार निवेदनासाठी मिळाला आणि अर्धा भार हलका झाला. या कार्यक्रमासाठी लागणारे पटकन बदलता येणारे सेटस कैवल्य चंद्रात्रेय, आनंद खरे, अभिजित आठवले आणि सचिन विद्वंस यांनी प्रचंड परिश्रमानी तयार केले. नाटक, एकपात्री प्रयोग, कथाकथन, संगीत, चित्रपट संगीत, वैचारिक भाष्य या सगळ्याचा मागोवा घेणारा १० तासांचा कार्यक्रम सादर झाला.

'नॉन स्टॉप पुल' मधील 'वाऱ्यावरची वरात' पाहून बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या कॅलगरी अधिवेशनासाठी 'वाऱ्यावरची वरात' आणि 'रविवारची सकाळ' असा प्रयोग करायचं आमंत्रण मिळालं. 'रविवार सकाळ'मध्ये पुलंची पेटी हे महत्वाचं अंग होतं आणि मला पेटी अजिबातच वाजवता येत नाही. आली का पंचाईत? पण आपल्या इथल्या गुणी कलाकारांकडे प्रत्येक समस्येवर तोडगा असतो. प्रशांत फाटकने विंगेत बसून पेटी वाजवायची आणि मी त्याप्रमाणे पेटीवर बोटं फिरवायची अशी कल्पना निघाली. वरवर बघायला जरी सोपी वाटली तरी प्रत्यक्षात अतिशय कठीण अशी ही गोष्ट. त्यातून माझं सुरांचं ज्ञान अगाध. त्यामुळे सूर वरचा तर माझी बोटं खालच्या सुरांवर असे अनेक विनोद झाले. त्यातून इतर कलाकारांनी या वाजवण्यासाठी मला दाद द्यायची असे प्रसंग. त्यामुळे दाद देताना माझ्या केविलवाण्या धडपडीमुळे त्यांच्या चेहऱ्यावर एक असुरी आनंद मला दिसायचा. शेवटी कसाबसा तो प्रयोग पार पडला आणि बऱ्याच लोकांनी "तुम्ही पेटी फार छान वाजवता हं" अशी प्रशंसा केली. चिन्मय भागवतचं 'दिल देके देखो' आणि 'उगीच का कांता' हे वाऱ्यावरची वरातचं खास आकर्षण आणि याच निमित्तानी अभिनय पाध्येमध्ये तबल्याबरोबरच अभिनय गुणही आहेत हे सगळ्यांना कळलं.

खेळ मांडियेला, नॉन स्टॉप पुल आणि वाऱ्यावरची वरातच्या निमित्तानी कित्येक समविचारी मित्र झाले. नाटक, संगीत, नृत्य हे कार्यक्रम करतानाच कलेच्या क्षेत्रात काही कायम स्वरूपात जतन करण्यासाठी उपक्रम करायचे अशी एक वेगळी दिशा अभय पाटीलने 'सूर्य पाहिलेला माणूस' या नाटकाचा नाट्यपट बनवून दाखवून दिली. मग कलाची स्थापना झाली. बे एरियामध्ये जे असंख्य गुणी कलाकार आहेत त्यांच्याबरोबरीने अनेकविध कार्यक्रम बसवण्याची संधी मिळाली. नाटकं, गाण्याचे कार्यक्रम, नृत्याचे कार्यक्रम या सगळ्यात आनंद देणारी गोष्ट म्हणजे त्या त्या कार्यक्रमाच्या तालमी. तालमीच्या निमित्ताने जी चर्चा चालते, जे मनमुराद हसण्याचे प्रसंग घडतात, जी एकमेकांना समजून घेण्याची प्रक्रिया घडते त्याची सर कुठल्याच अनुभवाला येणार नाही. म्हणून तर मी सारखा म्हणत असतो की, नाटक पाहावं करू...

■

**मुकुंद मराठे**

